# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला


जा.क्र. म.सं.के./तांत्रिक/३५१ /२०२१ दि. ०५/०७/२०२१

## निविदा सूचना

**विषय:- सन २०२१-२२ मध्ये मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे संरक्षण करण्यासाठी कंत्राट पद्धतीने कोरकू (tribal) पुरुष पुरविणेकरिता परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर (कोटेशन) बोलविणेबाबत.....**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे वन्यप्राणी व मोकाट जनावरांपासून संरक्षण करण्यासाठी कंत्राट पद्धतीने कोरकू (tribal) पुरुष पुरविण्याचे दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेला आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.

२. निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला याचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी.

३. निविदा धारक/कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा परवाना असणे बंधनकारक आहे. निविदा धारक/कंत्राटदाराला परवाना व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४. कंत्राट पद्धतीने पुरविण्यात येणाऱ्या कोरकू लोकांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदा धारकाची/कंत्राटदाराची राहील.

५. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालया अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे संरक्षण करीत असतांना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदा धारक/कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

६. विभागावर पिक संरक्षणाचे काम करतेवेळी काही दुर्घटना झाल्यास हे कार्यालय किंवा कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदा धारक/कंत्राटदाराची राहील.

७. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालया अंतर्गत विभागावर देण्यात आलेले पिक संरक्षणाचे काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

८. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदा धारक/कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

९. मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारक/कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बॅंक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१०. या कार्यालयातर्फे निविदा धारक/कंत्राटदारास पिक संरक्षणाकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य (उदा. बटरी ,शिट्टी, गम बूट) पुरविण्यात येणार नाही. पिक संरक्षणाकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदा धारक/कंत्राटदाराची राहील.

११. निविदा धारक/कंत्राटदारास पिक संरक्षण कामाचे देयक महिना पूर्ण झाल्यावर व संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच सदर देयक पारित करण्यात येईल.

१२. कंत्राटी कर्मचार्यांना कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पद्धतीचा अवलंब करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदा धारक/कंत्राटदाराची राहील.

१३. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालया अंतर्गत विभागाचे प्रक्षेत्रावर कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१४. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी निविदा धारक/कंत्राटदाराची असल्याचे रु. १०० चे स्टंप पेपर वर करारनामा सादर करणे संबंधित निविदा धारक/कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१५. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. १२.०७.२०२१ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

संचालक

मध्यवर्ती संशोधन केंद्र

डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# निविदा (कोटेशन) मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे संरक्षण करण्यासाठी कंत्राट पद्धतीने कोरकू (tribal) पुरुष पुरविणेकरिता दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशील | दर प्रति पुरुष प्रति दिवस (रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालया अंतर्गत विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे संरक्षण करणे | | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**स्वाक्षरी**

नाव व संपूर्ण पत्ता